## वादीतर्फे साक्षीदार क्र. १ श्री. संजय धोंडीराम साळुंखे यांचा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ एस. बी. खंजिरे यांचेमार्फत सुरू

माझे शिक्षण ९ वी पासपर्यंत झाले आहे. मी शेती खरेदी विक्रीचा व्यापार करतो. मी आजपर्यंत किती शेती खरेदी विक्रीचे व्यापार केले ते मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचे तथाकथीत करारपत्र झाले त्यावेळी दावा मिळकत बिगरशेती नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत तुकडा मिळकत होती. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या दि. ११–१०–२०१० च्या करारपत्राच्यावेळी दावा मिळकतीच्या सातबारा उता–यावर प्रतिवादीच्या नावाची नोंद नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी अंधेरी मुंबई येथे राहतात. मुंबई व नवी मुंबई वेगवेगळी आहेत. प्रतिवादी हे नवी मुंबई येथे राहत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींनी मला दावा मिळकत बिगरशेती करण्याबाबत अधिकारपत्र अथवा वटमुखत्यारपत्र दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरस्वती व विवेक यांच्या दावा मिळकती एकमेकाला लागून नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचा गुंठेवारी बिगरशेती आदेश प्रतिवादींनी घेतलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, ईमाईल बापू पटेल, मी व ॲड पटवा हे तारदाळ इचलकरंजी व हातकणंगले, ता. हातकणंगले येथील रहीवाशी आहोत. धनंजय विलासराव घोरपडे हे स्टॅम्प व्हेंडर इचलकरंजी येथे राहणारे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, धनंजय घोरपडे यांना इचलकंरजी शहरामध्ये स्टॅम्प विक्री करण्याची मर्यादा आहे.

हे म्हणणे खरे नाही की, दि. ११–१०–२०१० रोजी प्रतिवादी स्टॅम्प खरेदीसाठी इचलकरंजी येथे आले नव्हते. दि. ११–१०–२०१० रोजी प्रतिवादी किती वाजता स्टॅम्प खरेदीसाठी आले सांगता येत नाही. साक्षीदार सांगतो सकाळी आले होते.

प्रश्न – स्टॅम्प खरेदी केल्यानंतर करार इचलकरंजी येथे लिहीण्यास काही अडचण नव्हती.

उत्तर – त्याचे डॉक्युमेंट तिकडे होते.

नि. ३६ वर स्टॅम्प खरेदी करणार विवेक भुपाल कट्टी रा. नवी मुंबई आज मुक्कामी इचलकरंजी असे लिहीलेले नाही. स्टॅप्प व्हेंडर धनंजय विलासराव घोरपडे यांना मी साक्षीदार म्हणून तपासणार आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि. ३६ वरील स्टॅम्प प्रतिवादीनी खरेदी केलेला नाही. नि. ३६ वरील तथाकथित करारपत्रात गुंठेवारी आदेश नमुद नाही. दि. १०–०५–२०११ रोजी गुंठेवारी बिगरशेती आदेश झाला. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी विवेक भुपाल कट्टी यांचे नाव दावा मिळकतीच्या सातबारा उता–यावर फेरफार क्र. १९९७१ अन्वये दि. ०४–०२–२०११ रोजी दावा मिळकतीस

लागलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि. २९–०९–२०११ रोजी दावा मिळकतीचा बिगरशेती आदेश अस्तीत्वात नव्हता. दि. ०३–१०–२०११ रोजी शर्मा वकीलामार्फत पाठवलेल्या नोटीसीच्या दिवशी दावा मिळकतीचा बिगरशेती आदेश होता. नि. ३९ मधील नोटीसमध्ये मिळकतीच्या वर्णनामध्ये गुंठेवारी आदेशाचा क्रमांक नमुद नाही. तथाकथीत करारपत्रात गुंठेवारी आदेशाची नोंद दावा मिळकतीच्या वर्णनात उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, करारपत्रात नमुद दावा मिळकतीचे वर्णन नि. १ मध्ये नाही. नि. १ मध्ये केलेल्या दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये नमुद गुंठेवारी आदेशाचा तपशील तथाकथीत करारपत्रात नाही. नि. १ मध्ये केलेल्या दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये नमुद गुंठेवारी आदेशाचा तपशील नोटीसीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, या दाव्यात तथाकथीत करारपत्रात नमूद मिळकतीचे खरेदीखत करून मागितलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दाव्यातील परिछेद क्र. ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दावा मिळकतीची बिगरशेती गूंठेवारी आदेश मी स्वतः आणायचा असे दि. ११–१०–२०१० च्या करारपत्रातील अटी व शर्तीमध्ये नमुद नाही.

हे म्हणणे खरे आहे की, गुंठेवारी आदेश प्राप्त करण्याकरिता कागदपत्रांची पुर्तता व शपथपत्र तयार करावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, गुंठेवारी आदेश माझ्या नावाने आहे. नि. ३७ वरील गुंठेवारी आदेशातील अट क्र. ११ प्रमाणे तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख हातकणंगले यांचेकडून दावा मिळकतीची मोजणी करून घेतली नाही. नि. ३७ वरील गुंठेवारी आदेश अट क्र. ११ नुसार गुंठेवारी विकास प्रमाणपत्र घेतलेले नाही. हे म्हणणे खरे नाही कि. दि. १०–०५–२०११ चा नि. ३७ वरील गुंठेवारी आदेश त्यातील अटी शर्तीचे पालन झाले नाही म्हणून रद्द झाला आहे. गुंठेवारी कायद्यानुसार दावा मिळकत गुंठेवारी प्रमाणे पात्र क्षेत्रात मोडत नसल्याबाबत मी शपथपत्र दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि. ३७ वरील दि. १०–०५–२०११ चा गुंठेवारी आदेश हा चुकीचा बेकायदेशीर व रद्दबातल स्वरूपाचा आहे. दावा मिळकत तालुका निरीक्षक भुमि अभिलेख यांचेकडून रेखांकीत करून घेतली नाही.

माझा इचलकरंजी शहराशी कामानिमित्त संपर्क आहे. माझी सध्या बँक ऑफ इंडीया मुख्य शाखा इचलकरंजी व कलप्पान्ना आवाडे जनता सहकारी बँक, मुख्य शाखा, इचलकरंजी येथे बँक खाते आहेत. सदरची बँक खाती मागील आठ ते दहा वर्षापासुन आहेत. तारदाळ मध्ये एक ही बँक नाही. हे खरे आहे की मागील १५ वर्षापासुन तारदाळ मध्ये पतसंस्था आहेत. माझे तारदाळ येथे पंधरा वर्षापुर्वी पतसंस्थेत खाते नाही. साक्षीदार सांगतो मागील पाच वर्षापासुन आहे. दिनांक ११/१०/२०१०

रोजी माझे डोंबिवली बँक, शाखा–इचलकरंजी येथे खाते होते व त्या खात्यामधुन मी व्यवहार करत होतो. मी व्यवहार लिखानाच्या वह्या ठेवत नाही.

हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी माझ्याकडे रोख रक्कम शिल्लक होती हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. दिनांक ११/१०/२०१० रोजी माझ्याकडे रोख रक्कम शिल्लक होती हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. साक्षीदार प्रकरणातील कागदपत्रे पाहुन तसा कागद हजर केला नाही असे सांगतात. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी माझ्याकडे कोणतीही रक्कम रोख स्वरुपात शिल्लक नव्हती. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी मी प्रतिवादीला र.रु. १,३०,०००/– रोख दिले आहे हे खोटे सांगत आहे. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी प्रतिवादी हा इचलकरंजी मध्ये आला नाही. हे खरे आहेत की निशाणी ३६ वरील तथाकथीत करारपत्रासोबत कोणतेही कागदपत्र जोडलेले नाहीत. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी माझी विवेक भूपाल कट्टी किंवा तथाकथीत साक्षीदार यांची भेट झाली नाही. माहे ११ सन २०१० मध्ये माझ्याकडे स्वताचे चारचाकी वाहन नव्हते. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी मुंबईत नि. ३६ प्रमाणे तथाकथीत करार केल्याचे मी खोटे सांगतो.

मी शेती खरेदी विक्रीचा व्यापार मागील चार ते पाच वर्षापासुन करतो. त्या व्यापारा बाबत मी हिशोबाच्या वह्या ठेवलेल्या नाहीत. मी आयकर भरतो. आयकर विवरणपत्र या कामी हजर करण्यासाठी मी तयार आहे. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी अगर केव्हाही माझा व प्रतिवादीचा दावा मिळकत विक्रीबाबत कोणताही करार झालेला नाही. हे खरे नाही की मी ॲड. पटवा, सौ.विणा पाटील व इस्माईल पटेल यांनी दिनांक ११/१०/२०१० रोजीचा संगणमत करुन बोगस करारपत्र बनवलेले आहे. हे खरे नाही की मी केव्हाही प्रतिवादीला भेटून दावा मिळकत खरेदी करुन देणेबाबत विचारणा केलेली नाही. हे खरे नाही की ऑगष्ट २०११ मध्ये प्रतिवादी खरेदी खत करुन देतो म्हणाल्याचे मी खोटे सांगतो. हे खरे नाही की त्याकारणाकरीता मी स्टॅम्प व डिमांड ड्राफ्ट काढल्याचे खोटे सांगत आहे. हे खरे नाही की प्र.वादी हे दावामिळकत ति–हाईत इसमाला विकत असलेबाबत मी दाव्यामध्ये खोटे नमुद केले आहे. या दाव्यात तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी केलेला अर्ज नामंजुर झाला असुन त्याबाबत मी अपील केलेले नाही. हे खरे नाही की स्टॅम्प व डिमांड ड्राफ्ट काढुन ठेवल्याचे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी कोणतेही तथाकथीत करारपत्र झाले नाही व त्यापासुन मला कोणतेही अधिकार मिळत

नाहीत. हे खरे नाही की, प्रतिवादीला दावामिळकतीची देखभाल करण्यासाठी एका इसमाची गरज होती व त्याबाबत त्यांनी माझ्याकडे विनंती केली होती. हे खरे नाही की ऑगष्ट २०१० मध्ये प्रतिवादी मला भेटली व त्यांनी दावा मिळकतीवर कोणी अतिक्रमण करुनये म्हणून त्याचा गैर फायदा घेवून मी हा दावा दाखल केलेला आहे.

हे खरे नाही की दावामिळकतीत प्रतिगुंठा किंमत अडीच ते तिन लाख अशी सन २०१० मध्ये होती. हे खरे नाही की विणा पाटील यांच्याकडून फोटो उपलब्ध करुन ते करारपत्राला बोगस रीत्या चिटकवले आहेत. मी विणा पाटील यांची साक्ष नोंदविणार नाही. हे खरे नाही की प्रतिवादीची मिळकत गिळंकृत करायची म्हणून खोटा दावा दाखल करुन खोटी साक्ष देत आहे. विवेक भूपाल कट्टी यांचा दाव्यात व्यवसाय नोकरी म्हणून लिहीला आहे. दि. ११/१०/२०१० इ।। रोजी विवेक भूपाल कट्टी हे नोकरीचा व्यवसाय मुंबई येथे करत असलेचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी दावा दाखल करणेपूर्वी व केलेनंतर कोठे नोकरीस होता याची चौकशी केली नाही. विवेक कट्टी हे कोठे नोकरी करतात याची चौकशी करणेची मला गरज वाटली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. ११/१०/२०१० इ।। रोजी विवेक कट्टी हे त्यांच्या नोकरीच्या ठिकाणी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. ११/१०/२०१० इ।। रोजी विवेक कट्टी याने धनंजय विलास घोरपडे या इचलकरंजी येथील स्टॅम्प व्हेंडरकडून स्टॅम्प खरेदी केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. ११/१०/२०१० इ।। रोजी विवेक कट्टी याने माझ्या हक्कात करारपत्र लिहून दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. ११/१०/२०१० इ।। रोजी मी विवेक कट्टी याला संचकार म्हणून किंवा अन्य रक्कम म्हणून र.रू. १,३०,०००/- दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, विवेक कट्टी याने दि. ११/१०/२०१० चे करारपत्र माझ्या हक्कात लिहून दिलेचे खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, विवेक कट्टीची जमीन बळकावयाची म्हणून मी खोटा व चुकीचा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वार्थापोटी खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपास नाही.**

**उलटतपास पुर्ण**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

sd/-

**(डॉ.डी.जी.पटवे )**

दिनांक - ०१/०३/२०२४ **स.दि.न्या.क.स्तर, इचलकरंजी.**